# LUX INDUSTRIES LIMITED

CIN : L17309WB1995PLC073053

Regd. Office: 39, KALI KRISHNA TAGORE STREET, KOLKATA - 700 007

Email: info@luxinnerwear.com, Website:www.luxinnerwear.com, Ph : 033-40402121, Fax : 033-40012001

***Promises and performances that ensure comfort***

**Extract Of Audited Financial Results For The Quarter And Year Ended 31st March, 2020**

(₹ in Lakhs)

| PARTICULARS | STANDALONE | | | | CONSOLIDATED | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | QUARTER ENDED | | YEAR ENDED | | QUARTER ENDED | | YEAR ENDED | |
| | 31.03.2020 | 31.03.2019 | 31.03.2020 | 31.03.2019 | 31.03.2020 | 31.03.2019 | 31.03.2020 | 31.03.2019 |
| Total income from operations (net) | 28,640.94 | 39,118.79 | 1,20,690.60 | 1,21,787.85 | 28,824.85 | 39,120.39 | 1,20,989.93 | 1,21,609.03 |
| Net Profit / (Loss) before exceptional items and tax | 4,169.74 | 5,743.25 | 16,696.86 | 15,464.14 | 4,089.17 | 5,664.56 | 16,344.72 | 15,211.25 |
| Net Profit / (Loss) after exceptional items before tax | 4,169.74 | 5,743.25 | 16,696.86 | 15,464.14 | 4,089.17 | 5,664.56 | 16,344.72 | 15,211.25 |
| Net Profit / (Loss) after tax attributable to the owners of the Company | 3,055.31 | 3,763.49 | 12,601.30 | 10,131.39 | 3,015.41 | 3,684.80 | 12,288.66 | 9,879.84 |
| Total Comprehensive Income for the period (Net of Tax) attributable to the owners of the Company | 3,033.93 | 3,786.42 | 12,586.58 | 10,139.11 | 2,994.11 | 3,707.73 | 12,274.03 | 9,887.56 |
| Equity Share Capital (Face value Rs. 2/- per share) | 529.98 | 529.98 | 529.98 | 529.98 | 529.98 | 529.98 | 529.98 | 529.98 |
| Earnings Per Share (Basic & Diluted) (Face value Rs. 2/- per share)** | 12.10 | 14.90 | 49.90 | 40.12 | 11.94 | 14.59 | 48.66 | 39.12 |

* There was no exceptional and extra-ordinary item during the quarter and year ended 31st March, 2020.

** Not Annualised

**Notes :**

1. The above results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their meeting held on June 29, 2020.
2. The Board of Directors have recommended dividend of 125% (Rs. 2.50 per equity share of Rs. 2 each) for the financial year ended 31 March 2020 which is subject to approval of the shareholders in the Annual General Meeting. An interim dividend of 500% (Rs. 10 per equity share of Rs. 2 each) has already been paid in February 2020. The total dividend for the financial year ended 31 March 2020 is 625% (Rs. 12.50 per equity share of Rs. 2 each) (Previous Year 175% - Rs. 3.50 per equity share of Rs. 2 each).
3. A Scheme of Amalgamation of the Company with J.M. Hosiery & Co. Limited and Ebell Fashions Private Limited has been approved on June 26, 2018 by the Board of Directors of the respective companies and has been filed with the stock exchanges. Pending the regulatory approvals, no effect of the proposed merger has been considered in this Statement.
4. The above is an extract of the detailed format of Audited Financial Results filed with the Stock Exchange under Regulation 33 of the SEBI ( Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Audited Financial Results are available on the Stock Exchange website **(www.bseindia.com** and **www.nseindia.com)** and on the Company's website **(www.luxinnerwear.com)**.

By Order of the Board
for LUX INDUSTRIES LIMITED

Sd/- **Ashok Kumar Todi**
Chairman
DIN-00053599

Place : Kolkata
Date : June 29, 2020

***Few of our Best Sellers***

LUX cozi INNER WEAR | LUX VENUS THE ORIGINAL STYLE WEAR | ONN | LUX Inferno QUILTED THERMALS | LUX COTT'S WOOL WINTER WEAR | one8 X VIRAT KOHLI

## Dhunseri Ventures Limited

(Formerly Dhunseri Petrochem Limited)
Regd. Office : "Dhunseri House"
4A, Woodburn Park Kolkata - 700 020
Ph : 033-22801950-54, Fax : 033-22878995
E-mail : info@aspetindia.com
Website : www.aspetindia.com
CIN: L15492WB1916PLC002697

**NOTICE**

Pursuant to Regulation 47 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice dated 23rd June, 2020 was issued stating that the Board Meeting would be held on Saturday, the 27th June, 2020.

This is further to inform that the meeting has been re-scheduled and will be held on **Friday, the 3rd July, 2020** at the Company's Registered Office to consider inter-alia the Audited Financial Results of the Company for the year ended 31st March, 2020 and dividend, if any, for the year 2019-20.

By Order of the Board
For Dhunseri Ventures Limited
**Simerpreet Gulati**
Company Secretary &
Compliance Officer

Place : Kolkata
Date : 27th June, 2020

## BHAGERIA INDUSTRIES LTD.

**(CIN: L40300MH1989PLC052574)**
**Regd. Office:** 1002, 10th Floor, Topiwala Centre,Off S.V. Road, Goregaon (W), Mumbai 400 062. **Phone No.** +91-22-4043 6666, **Fax No.**+91-22-4043 6662
**Email:** info@bhageriagroup.com / **Website:** www.bhageriagroup.com

**NOTICE TO SHAREHOLDERS**

**(Sub: For transfer of shares of the Company to Investor Education and Protection Fund)**

**Notice** is given pursuant to the provisions of the Companies Act, 2013 read along with the Investor Education and Protection Fund Authority (Accounting Audit, Transfer and Refund) Rules, 2016 with the relevant circulars and amendments thereto ('IEPF Rules'), that the Company has sent intimation to the shareholders concerned regarding transfer of their shares to the Demat Account of the IEPF Authority in accordance with the IEPF Rules, in case they do not encash any of their dividend(s), which remains unpaid/unclaimed for last seven (7) consecutive years, by the next due date i.e. 30th September, 2020. The details of such shareholders including their folio number or DP and Client ID and number of shares due for transfer are also available on the Company's website **www.bhageriagroup.com.**

The concerned shareholders have been advised to make their claim for the unclaimed dividends in respect of the shares held by them by writing to the Company or the Company's Registrars & Share Transfer Agent, M/s. Sharex Dynamic (India) Pvt. Ltd, C 101, 247 Park, LBS Marg, Vikhroli West, Mumbai-400083. Tel.:022-28515606, **Email:support@sharexindia.com, Website: www.sharexindia.com**

In case shareholders wish to claim the shares/dividend after its transfer to IEPF, a separate application has to be made to the IEPF Authority, in form IEPF-5, as prescribed under IEPF Rules and the same is available along with all details at the IEPF **website: www.iepf.gov.in.**

**For Bhageria Industries Limited**

**Ketan Gaur**
**Company Secretary**

Place : Mumbai
Date : June 29, 2020

Mahindra Manulife MUTUAL FUND

**MAHINDRA MANULIFE INVESTMENT MANAGEMENT PRIVATE LIMITED**
(Formerly known as Mahindra Asset Management Company Pvt. Ltd.)
**Corporate Identity Number:** U65900MH2013PTC244758
**Registered Office :** "A" Wing, 4th Floor, Mahindra Towers, Dr. G.M Bhosale Marg, P.K. Kurne Chowk, Worli, Mumbai 400 018
**Corporate Office:** 1st Floor, Sadhana House, 570, P.B Marg, Worli, Mumbai – 400 018
Tel: 1800 4196244; website: www.mahindramanulife.com;
email id: mfinvestors@mahindra.com

## NOTICE - CUM – ADDENDUM NO. 29/2020

**THIS NOTICE - CUM – ADDENDUM SETS OUT CHANGES TO BE MADE IN THE SCHEME INFORMATION DOCUMENT (SID) AND KEY INFORMATION MEMORANDUM (KIM) OF MAHINDRA MANULIFE LIQUID FUND, AN OPEN ENDED LIQUID SCHEME OF MAHINDRA MANULIFE MUTUAL FUND**

Investors are requested to note that in terms of the requirements of SEBI Circular No. SEBI/HO/IMD/DF2/CIR/P/2019/101 dated September 20, 2019 read with SEBI Circular No. SEBI/HO/IMD/DF3/CIR/P/2020/47 dated March 23, 2020 and SEBI Circular dated SEBI/HO/IMD/DF3/CIR/P/2020/76 dated April 30, 2020, Mahindra Manulife Liquid Fund, an open ended liquid scheme ('Scheme') shall hold at least 20% of its net assets in liquid assets with effect from June 30, 2020. For this purpose, 'liquid assets' shall include Cash, Government Securities, T-bills and Repo on Government Securities. Further, in case, the exposure in such liquid assets falls below 20% of net assets of the Scheme, the AMC shall ensure compliance with the abovementioned requirement before making any further investments.

Pursuant to the above, necessary changes will be carried out at relevant places of the SID/KIM of the Scheme, as applicable.

This notice-cum- addendum shall form an integral part of the SID / KIM of the Scheme as amended from time to time and shall override the conflicting provisions, if any in this regard.

All the other provisions of the SID & KIM of the Scheme except as specifically modified herein above remain unchanged.

Cno. 00753

**For Mahindra Manulife Investment Management Private Limited**
*(Formerly known as Mahindra Asset Management Company Private Limited)*

**Place: Mumbai**
**Date: June 29, 2020**

**Sd/-**
**Authorised Signatory**

**Mutual Fund investments are subject to market risks, read all scheme related documents carefully.**

## Bosch Limited

Registered Office: Hosur Road, Adugodi, Bengaluru 560 030
Website: www.bosch.in
e-mail ID: investor@in.bosch.com
Tel: +91 80 6752 1750
CIN: L85110KA1951PLC000761

**NOTICE**

Pursuant to Regulation 29 read with Regulation 47 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, Notice is hereby given that a meeting of the Board of Directors of the Company is scheduled to be held on Tuesday, August 11, 2020 to, inter-alia, consider and approve the Unaudited Standalone and Consolidated Financial Results of the Company for the 1st quarter ended 30th June, 2020.

The said notice may be accessed on the Company's website www.bosch.in under "Shareholder Information" section and may also be accessed on the websites of the Stock Exchanges at www.bseindia.com and www.nseindia.com.

For Bosch Limited
Rajesh Parte
Company Secretary & Compliance Officer

Place: Bengaluru
Date: 29.06.2020

**Business Standard**
**MUMBAI EDITION**

Printed and Published by Sangita Kheora on behalf of Business Standard Private Limited and Printed at M/s. Dangat Media Private Limited, 22 Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai, 400708 and M/s. Nai Dunia 23/4, 23/5, Sector-D, Industrial Area, J.K. Road, Near Minal Residency, Bhopal (M.P.)-462023. & Published at H/4 & I/3, Building H, Paragon Centre, Opp. Birla Centurion, P.B.Marg, Worli, Mumbai- 400013

Editor : Shyamal Majumdar

RNI NO: 66308/1996

Readers should write their feedback at **feedback@bsmail.in**
Fax : +91-11-23720201

For Subscription and Circulation enquiries please contact:
**Ms. Mansi Singh**
**Head-Customer Relations**
Business Standard Private Limited.
H/4 & I/3, Building H,Paragon Centre, Opp. Birla Centurion, P.B.Marg, Worli, Mumbai - 400013
**E-mail: subs_bs@bsmail.in**
"or **sms**, SUB BS to 57007"

**Overseas subscription: (Mumbai Edition Only)**

One year subscription rate by air mail
INR 51765 : USD 725

**DISCLAIMER** News reports and feature articles in Business Standard seek to present an unbiased picture of developments in the markets, the corporate world and the government. Actual developments can turn out to be different owing to circumstances beyond Business Standard's control and knowledge. Business Standard does not take any responsibility for investment or business decisions taken by readers on the basis of reports and articles published in the newspaper. Readers are expected to form their own judgement.

Business Standard does not associate itself with or stand by the contents of any of the advertisements accepted in good faith and published by it. Any claim related to the advertisements should be directed to the advertisers concerned.

Unless explicitly stated otherwise, all rights reserved by M/s Business Standard Pvt. Ltd. Any printing, publication, reproduction, transmission or redissemination of the contents, in any form or by any means, is prohibited without the prior written consent of M/s Business Standard Pvt. Ltd. Any such prohibited and unauthorised act by any person/legal entity shall invite civil and criminal liabilities.

**No Air Surcharge**

# SITI NETWORKS LIMITED

Regd. Office: Unit No. 38, 1st Floor, Madhu Industrial Estate, Pandurang Budhkar Marg, Worli, Mumbai 400013
Tel.: +91 22 43605555 Email:- csandlegal@siti.esselgroup.com CIN:- L64200MH2006PLC160733 Website : www.sitinetworks.com

**EXTRACT OF AUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND FINANCIAL YEAR ENDED MARCH 31,2020**

**(₹ in lacs except per share data)**

| Particulars | Consolidated Financial Results | | | | | Standalone Financial Results | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Three months ended March 31, 2020 (Refer Note 4) (Audited) | Preceding three months ended December 31, 2019 (Unaudited) | Corresponding three months ended March 31, 2019 (Refer Note 4) (Audited) | Financial Year ended March 31, 2020 (Audited) | Financial Year ended March 31, 2019 (Audited) | Three months ended March 31, 2020 (Refer Note 4) (Audited) | Preceding three months ended December 31, 2019 (Unaudited) | Corresponding three months ended March 31, 2019 (Refer Note 4) (Audited) | Financial Year ended March 31, 2020 (Audited) | Financial Year ended March 31, 2019 (Audited) |
| **Total Income from Operations** | 41,346.2 | 40,794.3 | 33,826.6 | 1,63,572.5 | 147,437.2 | 20,499.0 | 20,585.1 | 20,236.8 | 82,545.6 | 84,263.3 |
| **Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items)** | (3,756.6) | (3,422.2) | (4,812.7) | (14,560.6) | (17,983.5) | (3,575.2) | (3,103.4) | (3,946.6) | (15,659.2) | (17,833.9) |
| **Net Profit / (Loss) for the period before Tax (after Exceptional and/or Extraordinary items)** | (6,851.0) | (3,349.9) | (12,029.3) | (19,474.8) | (25,424.3) | (6,375.5) | (3,103.4) | (22,724.5) | (18,459.5) | (37,242.7) |
| **Net Profit / (Loss) for the period after Tax (after Exceptional and/or Extraordinary items)** | (7,029.9) | (3,359.5) | (12,391.9) | (18,816.7) | (26,428.3) | (6,445.4) | (3,103.4) | (22,724.5) | (18,937.0) | (37,242.7) |
| **Total Comprehensive Income for the period (Comprising Profit/(Loss) for the period (after Tax) and other Comprehensive Income (after Tax)** | (7,143.5) | (3,365.3) | (12,435.7) | (18,947.8) | (26,450.1) | (6,506.7) | (3,107.2) | (22,752.5) | (19,009.6) | (37,257.8) |
| **Equity Share Capital (Face value of Re.1/- per share)** | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 | 8,720.5 |
| **Earning Per Share (before Extraordinary Items) (of Rs.1/- each) Basic and Diluted (Rs) (not annualised)** | (0.8) | (0.4) | (1.4) | (2.2) | (3.0) | (0.7) | (0.4) | (2.6) | (2.2) | (4.3) |
| **Earning Per Share (after Extraordinary Items) (of Rs.1/- each) Basic and Diluted (Rs) (not annualised)** | (0.8) | (0.4) | (1.4) | (2.2) | (3.0) | (0.7) | (0.4) | (2.6) | (2.2) | (4.3) |

**Notes :**

1. The above financial results have been reveiwed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on June 29, 2020 and have undergone 'Limited Review' by the Statutory Auditors of the Company.
2. The above Financial Results for the fourth quarter and financial year ended on March 31, 2020 has been prepared in accordance with Indian Accounting Standards (Ind AS, the provisions of the Companies Act, 2013(the Act), as applicable and guidelines issued by the Securities and Exchange Board of India (SEBI).
3. The above is an extract of the detailed format of Audited Financial Results for the for the fourth quarter and financial year ended on March 31, 2020 filed by the Company with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure requirements) Regulations, 2015. The full format of the Audited Financial Results for the fourth quarter and financial year ended on March 31, 2020 are available on the Stock Exchange websites (www.bseindia.com and www.nseindia.com) and also on the Company's website www.sitinetworks.com
4. Figures for the standalone and consolidated financial results for the quarter ended March 31, 2020 and March 31, 2019 are the balancing figures between audited figures of the respective financial year and the published year to date figures upto the third quarter of the relevant financial year. Also, the aforementioned financial results upto the end of the third quarter were only reviewed and not subjected to audit.
5. **Modified opinion in Standalone Auditors Report:** The Company's 'Revenue from Operations' includes broadcasters' share in subscription income from pay channels, which has correspondingly been presented as an expense which is not in accordance with the requirements of Ind AS-115, 'Revenue from contracts with customers'. Had the management disclosed the same on net basis, the 'Revenue from Operations' and the 'Pay channel, carriage sharing and related costs' each would have been lower by Rs. 9,515.5 lacs and Rs. 39,023.8 lacs for the quarter and year ended 31 March 2020 respectively, while there would have been no impact on the net loss for the quarter and year ended 31 March 2020.
   Our conclusion on the standalone financial result for the quarter and nine-month ended period ended 31 December 2019 was also qualified with respect to this matter.
6. **Modified opinion in Consolidated Auditors Report:**
   The Group's 'Revenue from Operations' includes broadcasters' share in subscription income from pay channels, which has correspondingly been presented as an expense which is not in accordance with the requirements of Ind AS-115, 'Revenue from contracts with customers'. Had the management disclosed the same on net basis, the 'Revenue from Operations' and the 'Pay channel, carriage sharing and related costs' each would have been lower by Rs. 19,340.7 lacs and Rs. 77,575.4 lacs for the quarter and year ended 31 March 2020 respectively, while there would have been no impact on the net loss for the quarter and year ended 31 March 2020. Our conclusion on the consolidated financial results for the quarter and nine-month ended period ended 31 December 2019 was also qualified with respect to this matter.
   **Management Comment on Sl.No.5 & 6 above:** For the quarter and year ended March 31, 2020 and for the quarter ended December 31, 2019, the 'Subscription income' included in the 'Revenue from operations' in these financial results, inter alia, includes the amounts payable to the broadcasters towards their share in relation to the pay channels subscribed by the customers. The aforementioned corresponding amounts (i.e Broadcaster's share) has also been presented as an expense in these financial results. The said amounts are ₹ 9,515.5 lacs and ₹ 39,023.8 lacs respectively for quarter and year ended March 31, 2020 and ₹ 9,646.5 lacs for the quarter ended December 31, 2019 in the standalone financial results and ₹ 19,340.7 lacs and ₹ 77,575.4 lacs respectively for the quarter and year ended March 31, 2020 and ₹ 19,816.6 lacs for the quarter ended December 31, 2019 in the consolidated financial results.
   Had these expenses been disclosed on net basis, the 'Revenue from operations' and the 'Pay channel, carriage sharing and related costs' each would have been lower by ₹ 9,515.5 lacs, ₹ 39,023.8 lacs and ₹ 9,646.5 lacs for quarter and year ended March 31, 2020 and for the quarter ended December 31, 2019 respectively in the standalone financial results and lower by ₹ 19,340.7 lacs, ₹ 77,575.4 lacs and ₹ 19,816.6 lacs for the quarter and year ended March 31, 2020 and for the quarter ended December 31, 2019 respectively in the consolidated financial results. However, there would not have been any impact on the net loss for the quarter and period then ended in both the standalone and consolidated financial results. The management is in process of evaluating the aforesaid presentation in light of generally accepted accounting principles, including Ind AS-115, 'Revenue from contracts with customers' and industry practices.
7. **Modified opinion in Consolidated Auditors Report:**
   The consolidated financial results include total assets of Rs. 15,439.1 lacs as at 31 March 2020, total revenues of Rs. 8,707.4 lacs, total net profit after tax of Rs. 1,430.8 lacs, total comprehensive income of Rs. 1,430.8 lacs and net cash outflow amounting to Rs. 150.6 lacs for the year ended on that date relating to two subsidiaries, which are unaudited and are based on financial statements furnished to us by the Holding Company's management. Our opinion on the Statement, in so far as it relates to the amounts and disclosures included in respect of the aforesaid subsidiaries, is based solely on such unaudited financial statements. Accordingly, we are unable to comment on the impact, if any, on the accompanying Statement if the aforementioned financial statements had been audited, other than the impact of the matter described in section A above.
   **Management Comment on Sl.No.7 above:** The reasons for not able to complete the Audit as informed by the subsidiaries:
   (a) Siti Vision Digital Media Private Limited –
      (i) Due to lockdown in the country for a period of about 65 days and also disturbance even thereafter also for the reason of outburst of COVID-19, which has been declared as pandemic worldwide, the Subsidiary's Auditors / Management of the Company were not able to complete audit procedures within timelines;
      (ii) Further, due to sudden death of mother of managing director of Siti Vision Digital Media Private Limited, Mr. Siva Rama Krishna Kancharla, he could not be able to supervise and observe audit process and timelines
   (b) Siti Saistar Digital Media Private Limited-
      Due to lockdown in the country for a period of about 65 days and also disturbance even thereafter also for the reason of outburst of COVID-19, which has been declared as pandemic worldwide, the Subsidiary's Audit Team/ Management of the Company were not able to complete audit procedures with timelines.

**For Siti Networks Limited**
**Sd/-**
**Suresh Arora**
**Whole Time Director**
**(DIN -00299232)**

**Place : Noida**
**Date : June 29, 2020**

# पोलिसांची नाकाबंदी, वाहनांची कोंडी!

## दहिसर टोल नाका, मुलुंड टोलनाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : कोरोना प्रतिबंधासाठी असलेल्या 'लॉकडाऊन' मधून शिथीलता (अनलॉक) देण्यात आल्यानंतर महिनाभरात पुन्हा कोरोनाने डोके वर काढल्याने पोलिसांनी पुन्हा नाकाबंदीला सुरुवात केली. त्यामुळे दहिसर, मुलुंड टोलनाक्यावर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता मुंबई पोलिसांनी पश्चिम द्रुतगती मार्गावर ठिकठिकाणी नाकाबंदी केली होती. प्रत्येक वाहनाच्या तपासणीबरोबरच वाहनचालकांचीही कसून चौकशी होत होती. पोलिसांच्या या कारवाईमुळे दहिसर टोल नाका आणि मुलुंड टोलनाक्यावर प्रचंड मोठी वाहतूककोंडी झाली होती.

तीन महिन्यांच्या 'लॉकडाऊन'मधून शिथीलता मिळाल्यावर मुंबईत हळूहळू काही उद्योग, व्यवसाय, खासगी कार्यालये सुरु होत आहेत. मुंबई उपनगर, दहिसर, भाईंदर, ठाणे या भागातील शेकडो नागरिक कामानिमित्ताने मुंबईच्या दिशेला जात आहेत. त्यामुळे मुंबईच्या दिशेकडे गाड्यांची संख्यादेखील वाढली होती. पोलीस या सर्व गाड्यांची तपासणी करत होते. त्यामुळे वाहतूककोंडी झाली होती.



मुंबईत कोरोनाचे मोठे संकट आहे. फक्त राज्यातच नव्हे, तर देशभरातील एकूण रुग्णांपैकी सर्वाधिक रुग्ण मुंबईत आढळले आहेत. त्यामुळे खबरदारी घेणे जरुरीचे आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी मुंबईकडे येणाऱ्या वाहनांची कडक तपासणी सुरू केली होती. वाहनचालकांनी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्या, त्यांच्यावर दंडदेखील आकारला जात होता. मात्र, महिनाभराने शासनाला पुन्हा जाग आल्याने वाहनचालक पोलिसांशी हुज्जत घालत होते. त्यामुळे अधिकच रखडपट्टी होत होती.

काही चारचाकी गाड्यांवर अत्यावश्यक सेवेचा स्टिकर नव्हता. अशा गाड्यांची पोलीस कसून चौकशी करत होते. कारणाशिवाय दोन किमी परिघाच्याबाहेर आलेल्या वाहनांच्या चालकावर वाहनजप्तीची कारवाई होत होती.

### नाकाबंदीमुळे कोंडी

दहिसर टोल नाका, कांदिवली येथील एस. व्ही. रोड, पश्चिम द्रुतगती मार्गावरील समता नगर, बोरिबली, मालाड–मार्वे रोड, बोरिवली कोरा केंद्र पूल या ठिकाणी मुंबई पोलिसांनी नाकाबंदी केली. कांदिवली येथे तर पीपीई किट घालून पोलीस कारवाई सुरू होती.


### चार हजार गाड्या जप्त

राज्यात 'अनलॉक'च्या पहिल्या टप्प्यात शिथीलता मिळताच त्याचा गैरफायदा घेत विनाकारण घराबाहेर पडणाऱ्या वाहनचालकांवर मुंबई पोलिसांनी कडक कारवाई केली. मुंबई पाोलिसांनी दिवसभरात ४ हजार ८६४ गाड्या जप्त केल्या आहेत. मरिन ड्राईव्हपासून दहिसर–मुलुंडपर्यंत ही कारवाई केली आहे. विशेष म्हणजे झोन १० मध्ये सर्वाधिक १ हजार २९७ गाड्या जप्त केल्या आहेत. पोलिसांच्या या कारवाईनंतर त्यांना चांगलाच वचक बसण्याची शक्यता आहे.

# महापालिकेतील शिक्षणाधिकाऱ्यांचा 'कोविड' काळातही शिक्षकांवर अन्याय

## म्युनिसिपल समर्थ कामगार संघटनेची आयुक्तांकडे तक्रार

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**: सध्या कोविड काळात अनेक कामगारांप्रमाणे शिक्षकही कोरोनाशी लढत असताना, तसेच अनेक शिक्षक कोविड संसर्गित असताना त्यांना समजून घेण्याऐवजी पालिका शिक्षणाधिकारी त्यांना त्रस्त करत असल्याने म्युनिसिपल समर्थ कामगार संघटनेने आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे.



शिक्षकांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या ऑनलाईन शिक्षण पद्धतीच्या परिपत्रकाचा गैरवापर करत शिक्षणाधिकारी शिक्षकांना उगाचच त्रास देत आहेत. शासनाच्या परिपत्रकात ऑनलाईन शिक्षण जसे शक्य होईल तसे देण्याचे निर्देश आहेत. त्या मार्गदर्शक सूचनांचा शिक्षणाधिकारी हवा तसा वापर करत आहेत. रात्री उशिरापर्यंत 'झूम'वर बैठका घेऊन शिक्षकांना वेठीस धरत आहेत.

शिक्षकांच्या म्हणण्यानुसार या कठीण परिस्थितीत मुले शिक्षणापासून वंचित राहू नयेत म्हणून ऑनलाईन शिक्षणपद्धती हा एक पर्याय आहे. ही सक्तीची शिक्षण पद्धती नाही किंवा शासनाच्या परिपत्रकात तसा उल्लेखही नाही. १५ जून ते ३० जून हा शाळा पूर्वतयारी पंधरवडा आहे. मात्र शिक्षणाधिकारी या पंधरवड्यातही १) रोज ४ तास शिकवा, २) त्यांची लिंक भरा, ३) गरज नसतानाही 'कंटेनमेंट झोन'मधील (नसलेल्या) शिक्षकांना शाळेत १०० टक्के उपस्थित राहा, ४) विभाग निरीक्षकांकडून शिक्षकांच्या ऑनलाईन अध्यापनाचे मूल्यपामन करायला लावून त्याच्या नोंदी ठेवा आणि त्याप्रमाणे त्याची सॅपमध्ये उपस्थिती लावा, असे आदेश देत आहेत. मात्र हे आदेश देताना शासनाच्या परिपत्रकातील सूचनांना बगल देत ते त्यांना सोयीस्कर अर्थ काढून शिक्षकांवर अन्याय करत आहेत. त्यामुळे शिक्षक तणावाखाली आहेत, असा आरोप पत्रकात करण्यात आला आहे.

शाळा पूर्वतयारी पंधरवड्यात (१५ जून ते ३० जून) शिक्षकांना परिशिष्टानुसार कार्यवाही करावी असा उल्लेख केला आहे. पण, परिशिष्ट काय ते सांगितलेले नाही. ऑनलाईन एज्युकेशन सगळ्यांनाच नवीन असल्याने शिक्षकांनी एक 'पायलट प्रोजेक्ट' तयार करायचा, तो त्यांनी टॅबमध्ये लोड करायचा, तो टॅब आणि एसडी कार्ड मुलांना पोहोचवायचे आहे. मात्र, ज्यांच्याकडे टॅब नाही, त्यांनी कसा अभ्यास करायचा, असा प्रश्न करू हे शिक्षक म्हणतात की मुलांना अजून पाठ्यपुस्तके नाहीत, त्यांच्याकडे वह्या नाहीत. मग त्यांनी कसा अभ्यास करायचा आणि याचे मूल्यमापन कसे करणार, असा प्रश्न शिक्षक विचारत आहेत.

ऑनलाईन शिक्षण देण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण द्या, असे शासनातर्फे सांगण्यात आले आहे. मात्र अजून त्याबाबत शिक्षणाधिकाऱ्यांकडून परिपत्रक आलेले नाही. यानंतर परिपत्रक काढणार आणि नंतर प्रशिक्षण देणार, असा हा सावळागोंधळ आहे.

काही शिक्षक अजूनही कोविड संदर्भात काम करत आहेत. त्यांना परत बोलवा असे निर्देश असतानाही परत बोलावण्यात आलेले नाही. मग त्यांनी ऑनलाईन कसे शिकवावे, असा प्रश्नही या शिक्षकांनी उपस्थित केला आहे.

सध्या राज्य सरकार आणि महापालिकेचे कर्मचारी 'वर्क फ्रॉम होम' करत असताना ऑनलाईन कामाचा अहवाल कोण भरत आहे, असा प्रश्न करून शिक्षक म्हणतात की, ऑनलाईन अध्यापनाची 'सॅप'शी असलेली लिंक बेकायदा असून ती बंद करावी, शिक्षकांच्या ऑनलाईन शिक्षण अध्यापनाचे मूल्यमापन करून त्यांच्या वेतनावर गदा आणू नये, अशी मागणी करतानाच १२ जूनपासून वेगवेगळ्या प्रकारची पत्रके काढून शिक्षकांची दिशाभूल करणाऱ्या शिक्षणाधिकाऱ्यांवर १०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

दरम्यान यातील एक शिक्षक ऑनड्युटी असताना त्यांना कोविडचा संसर्ग झाला होता. त्यांनी त्यांची फाईल संबंधित अधिकाऱ्यांना दाखवली होती. मात्र त्यांना विश्रांती न देता जबरदस्तीने ड्यूटी करण्यात भाग पाडले. त्यातच त्या शिक्षकाचा अंत झाला, असा गंभीर आरोपही या शिक्षकांनी केला आहे.

### लिंक भरणे शिक्षकांच्याच फायद्याचे

"१५ जूनपासून आपण 'वर्क फ्रॉम होम' केले आहे. त्याचा अहवाल ठेवणे भाग आहे. म्हणूनच आपण लिंक भरायला सांगत आहोत. ती लिंक भरणे शिक्षकांच्याच फायद्याचे आहे. १६ मार्च ते ३० एप्रिल आपण 'वर्क फ्रॉम होम' केले होते. त्यावेळी 'वर्क फ्रॉम होम'काय केले त्याचा अहवाल मागितलेला आहे. अहवाल सादर करायचा असेल तर तो फॉर्म भरल्याशिवाय माझ्याकडे अहवाल कसा येईल? अहवाल म्हणजे काय, तर तुम्ही काय काम केले ते सांगायचे आहे. शिक्षकांची ड्यूटी सहा तासांची आहे. त्यातील एक तास ड्यूटी करायची आहे आणि त्या अवधीत काय काम केले ते त्या फॉर्ममध्ये भरायचे आहे. त्यात काय अडचण आहे? 'गुगल', 'झूम' घेतले, 'गुगल मीट' यापैकी कशावरून शिकविले, कुठला धडा शिकविला एवढेच त्यात लिहायचे आहे. हे रोजच्या रोज नमूद करायचे आहे. त्यात अडचण कोणती? शिक्षकांच्या कामकाजाचा अहवाल द्यायचा झाला तर कुठून आणि कसा देणार? या कोविड काळात कोणत्याच शिक्षकांच्या वेतनात कपात झालेली नाही. अहवाल देणे हे शिक्षकांच्या फायद्याचे आहे. लेखा विभागाने कामकाजाविषयी विचारले तर आपण काय उत्तर देणार? त्यापेक्षा आतापासूनच तयारीत राहण्यासाठीच हा खटाटोप.

**महेश पालकर**, शिक्षणाधिकारी, मुंबई महानगरपालिका

# 'सोशल डिस्टन्सिंग'चे नियम पाळा

## 'आरपीएफ'च्या जवानांचे अत्यावश्यक सेवेतील प्रवाशांना आवाहन

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**: लोकलने प्रवास करताना 'सोशल डिस्टन्सिंग'चे नियम पाळत, तोंडावर मास्क लावूनच प्रवास करा, असे आवाहन आरपीएफच्या जवानांनी अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या रेल्वे प्रवाशांना केले आहे. १५ जूनपासून अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्यांसाठी मुंबई उपनगरीय लोकल धावू लागली आहे. मात्र, कोरोनाचा प्रसार मुंबईत वाढताना दिसत आहे, त्या धर्तीवर आरपीएफने लोकल प्रवाशांना हे आवाहन केले आहे.

कोरोना प्रतिबंधासाठी 'लॉकडाऊन'मुळे २२ मार्चपासून सार्वजनिक वाहतूक सेवा बंद होती. परंतु, 'लॉकडाऊन' शिथील केल्यानंतर अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी १५ जूनपासून लोकल पुन्हा एकदा धावू लागली आहे. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रत्येकाने काळजी घेणे गरजेचे आहे. त्यामुळे लोकलने प्रवास करताना 'सोशल डिस्टन्सिंग'चे नियम पाळत तोंडावर मास्क लावूनच प्रवास करावा असे आवाहन आरपीएफकडून करण्यात येत असल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.



अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी आरपीएफने पुढाकार घेतला आहे. राज्य सरकारच्या सूचनेनुसार मध्य रेल्वे अत्यावश्यक सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी २०० विशेष लोकल ट्रेन (मुख्य मार्गावर १३० आणि हार्बर मार्गावर ७०) चालवत आहेत. जीआरपी आणि सिव्हील पोलिसांच्या समन्वयाने रेल्वे सुरक्षा दलाच्या जवान उपनगरी स्थानकांवर आणि गाड्यांमधून 'सोशल डिस्टन्सिंग' कायम ठेवत प्रवास अशा सूचना करत आहेत.

हजारो अत्यावश्यक सेवा कर्मचाऱ्यांना रांगेत ट्रेनमध्ये चढणे आणि 'सोशल डिस्टन्सिंग'चे पालन सुनिश्चित करणे एक कठीण आव्हान आहे. मध्य रेल्वेने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, दादर, ठाणे, डोंबिवली, कल्याण, पनवेलसह सर्व उपनगरीय स्थानकांवर व उपनगरीय ट्रेनमध्ये अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, प्रवाशांची सुरक्षा सुनिश्चित केली जावी, यासाठी २४०० आरपीएफ आणि आरपीएसएफ जवान २४ बाय ७ तत्त्वावर तैनात केले आहेत. प्रवाशांना मार्गदर्शन करण्यासाठी गोल, बाण, चौकोन, प्लॅटफॉर्म आणि फूट ओव्हर ब्रिज यासारख्या ठिकाणी 'सोशल डिस्टन्सिंग'च्या ५० हजारांपेक्षा जास्त चिन्हांव्यतिरिक्त, सुरक्षित प्रवासासाठी स्थानकांवर एक किंवा दोन प्रवेश/निर्गम बिंदू सुनिश्चित करण्यासाठी स्टेशन सुरक्षा योजना लागू करणे, प्रवाशांना घोषणांच्या माध्यमातून शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन आरपीएफने केले आहे. तसेच प्रवाशांना होणाऱ्या कोणत्याही संसर्गापासून बचाव करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्टेशनवर हाय स्पीड स्वयंचलित थर्मल स्क्रीनिंग सिस्टीम चालू केल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

# मुंबईत मास्कशिवाय फिरल्यास १ हजार रुपये दंड

## महापालिका प्रशासनाचा निर्णय



**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**: कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता, मुंबईत मास्क लावल्याशिवाय फिरल्यास संबंधिताकडून एक हजार रुपये दंड वसूल करण्यात येणार आहे. वाढता कोरोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी पालिकेने मास्कसाठी कडक निर्णय घेतला आहे.

मुंबईत कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. मुंबईत दरदिवशी जवळपास बाराशे कोरोनाबाधित रुग्णांची नोंद करण्यात येत आहे. मुंबईत दोन महिन्यांच्या 'लॉकडाऊन'नंतर हळूहळू स्थिती पूर्वपदावर येत आहे असे वाटत असतानाच रुग्ण वाढू लागले आहेत.

रस्ते, कार्यालये, दुकाने, बाजार, दवाखाने, रुग्णालये यांसारख्या सार्वजनिक ठिकाणी वावरताना प्रत्येक नागरिकाने मास्क लावणे बंधनकारक करण्यात आले आहे. कार्यालयीन वापराच्या किंवा खासगी वाहनातून प्रवास करताना देखील प्रत्येकाने मास्क लावणे बंधनकारक आहे. कोणत्याही बैठकीला किंवा एकत्र येताना तसेच कार्यस्थळी मास्क लावल्याशिवाय उपस्थित राहणे हे कोरोनाविरोधातील नियमांच्या विरुद्ध मानण्यात येणार आहे.

# पश्चिम रेल्वेवर लोकलच्या ४० जादा फेऱ्या

## 'अत्यावश्यक सेवे'तील कर्मचाऱ्यांसाठी मोठा दिलासा

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**: अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्यांची गैरसोय होऊ नये यासाठी पश्चिम रेल्वे प्रशासनाने ४० जादा फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतला आहे. पश्चिम रेल्वेच्या निर्णयामुळे अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळाला असून सोमवारपासून रोज २०२ फेऱ्या होणार असल्याचे पश्चिम रेल्वेच्या जनसंपर्क विभागातील अधिकाऱ्याने सांगितले.



१५ जूनपासून अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्यांसाठी मुंबई उपनगरीय लोकल पुन्हा धावू लागली आहे. परंतु लोकल फेऱ्या वाढवा, अशी मागणी प्रवाशांकडून होऊ लागली. प्रवाशांच्या मागणीची दखल घेत पश्चिम रेल्वे प्रशासनाने ४० जादा लोकल फेऱ्या चालवण्याचा निर्णय घेतल्याचे अधिकाऱ्याने सांगितले.

### 'या' मार्गावर धावणार लोकल

चर्चगेट ते बोरिवली दरम्यान धीम्या मार्गावर २० फेऱ्या, चर्चगेट–विरार जलद मार्गावर १४ फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. तसेच बोरिवली– वसई रोड धीमा मार्ग, वसई रोड–चर्चगेट जलद मार्ग आणि बोरिवली–विरार धीमा मार्ग या तिन्ही मार्गावर प्रत्येकी दोन फेऱ्या वाढवण्यात आल्या आहेत. यामुळे पश्चिम रेल्वेवर सोमवारपासून एकूण २०२ फेऱ्या होणार आहेत. मुंबईत कोरोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना उशिरापर्यंत सेवा करावी लागत असल्याने त्यांच्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा ठरणार आहे. रेल्वे प्रशासनाच्या या निर्णयामुळे अत्यावश्यक सेवा बजावणाऱ्या प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

# महापौर किशोरी पेडणेकर बॉम्बे रुग्णालयात दाखल

**मुंबई** : किडनीमध्ये स्टोन असल्याचे निदर्शनास आल्याने मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांना बॉम्बे रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मागील दोन–तीन दिवसांपासून त्यांची तब्येत ठीक नसल्याने त्या घराबाहेर पडल्या नव्हत्या. सोमवारी त्यांना त्रास व्हायला लागल्याने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले असल्याचे सांगण्यात आले.

**भगेरिया इंडस्ट्रीज लि.**
(CIN: L40300MH1989PLC052574)
**नोंद. कार्यालय:** १००२, १० वा मजला, टोपीवाला सेंटर, ऑफ एस. व्ही. रोड, गोरेगाव (प), मुंबई ४०० ०६२. **दूरध्वनी:** +९१-२२-४०४३ ६६६६, फॅक्स: +९१-२२-४०४३ ६६६२
**Email:** info@bhageriagroup.com; **Website:** www.bhageriagroup.com

**भागधारकांना सूचना**

**(विषय: कंपनीचे भाग गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधीमध्ये हस्तांतरीत करण्याकरिता)**

गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखांकन लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमन, २०१६, त्यामधील संबंधित परिपत्रके आणि दुरुस्त्यांसह ('आयईपीएफ नियमन') सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या तरतुदींच्या अनुरोधाने, **सूचना** देण्यात येते की, कंपनीने त्यांच्या संबंधित भागधारकांना त्यांचे भाग, जर त्यांनी त्यांचा लाभांश, जो गेली सात (७) सलग वर्षे प्रदान केलेला नाही/दावा केला गेलेला नाही, पुढील देय दिनांकास, म्हणजेच ३० सप्टेंबर, २०२० पर्यंत न घेतल्यास, आयईपीएफ नियमांना अनुसरून आयईपीएफ प्राधिकरणाच्या डीमॅट खात्यामध्ये हस्तांतरण करण्याबाबत सूचना पाठविल्या आहेत. अशा भागधारकांचे त्यांच्या फोलिओ क्रमांक किंवा डीपी आणि क्लायंट आयडी आणि हस्तांतरणाकरिता योग्य भाग संख्या समाविष्ट असलेला तपशील कंपनीच्या वेबसाईट **www.bhageriagroup.com** वर देखील उपलब्ध आहे. संबंधित भागधारकांना सल्ला देण्यात येतो की, त्यांच्या ताब्यात असलेल्या भागांच्या बाबतीतील दावा न केलेल्या लाभांशाकरिता त्यांचा दावा कंपनीस किंवा कंपनीचे रजिस्ट्रार आणि भाग हस्तांतरण एजंट, मे. शेअरएक्स डायनामिक (इंडिया) प्रा. लि., सी १०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी पश्चिम, मुंबई-४०००८३. दूरध्वनी: ०२२-२८५१५६०६, ईमेल : **support@sharexindia.com** वेबसाईट: **www.sharexindia.com** यांना करावा.

जर भाग/लाभांश आयईपीएफला हस्तांतरित झाल्यानंतर भागधारकांना दावा करावयाचा असल्यास आयईपीएफ नियमन अंतर्गत विहीत असल्यानुसार आयईपीएफ-५ च्या स्वरुपात आयईपीएफ प्राधिकरणास स्वतंत्र अर्ज करावा आणि तो विहीत अर्ज सर्व तपशिलासह आयईपीएफ **वेबसाईट : www.iepf.gov.in** वर उपलब्ध आहे.

**भगेरिया इंडस्ट्रीज लिमिटेडकरिता**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक : जून २९, २०२०**

**केतन गौर**
**कंपनी सचिव**

# अखेर मुंबईत 'कोसळधार'

## आर्द्रतेतून सुटका झाल्याने मुंबईकर आनंदित



**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**: अनेक दिवस दडी मारलेल्या पावसाने हजेरी लावताच मुंबईकरांनी आनंद व्यक्त केला आहे. मुंबई शहराबरोबरच आज रात्री ८ वाजताच्या सुमारास अंधेरी, जोगेश्वरी, मालाड, बोरिवली या उपनगरातही पावसाने हजेरी लावली.

'निसर्ग' चक्रीवादळाबरोबर आलेल्या पावसानंतर अधूनमधून हलक्या स्वरूपात पाऊस हजेरी लावत होता. मात्र, गेल्या १५ दिवसांहून अधिक काळ दडी मारलेल्या पावसाने दि. २९ जून रोजी विजांच्या लखलखाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह उपनगरात हजेरी लावली. त्यामुळे उकाड्यामुळे हैराण झालेल्या मुंबईकरांनी समाधान व्यक्त केले.

यंदा पाऊस लवकर येणार असे भाकीत वर्तविण्यात आले असले तरी मुंबईकरांना मुसळधार पावसासाठी जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत वाट पाहावी लागेल, असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला होता. कोकणासह पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे दमदार आगमन झाले असले तरी मुंबईत हवा तसा पाऊस झालेला नाही. मुंबईच्या विविध भागांत रात्री आणि पहाटे पावसाच्या मध्यम स्वरूपाच्या सरी पडून जातात. मुंबईत पावसाचे आगमन वेळेत झाले, पण नंतर त्यात असा खंड पडला की, हवेतील आर्द्रता वाढत गेली. ही आर्द्रता ९० टक्क्यांपर्यंत पोहोचली. त्यामुळे मुंबईकर उकाड्याने खूप हैराण झाले होते. तापमान आणि आर्द्रतेमुळे मुंबईकर घामाघूम होत होते. तसेच रात्रीही वाढत्या आर्द्रतेमुळे नागरिक हैराण होत होते. अशा वेळी आज बरसलेल्या पावसाने मुंबईकरांना दिलासा मिळाला.

# ... तर गाडी पेट घेऊ शकते!

- 'लॉकडाऊन'मध्ये 'बंद गाड्या' सर्व्हिसिंग करूनच बाहेर काढा
- रस्त्यांवरील अपघात टाळण्यासाठी अग्निशमन दलाचे नागरिकांना आवाहन



**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)**:कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'लॉकडाऊन'मध्ये तीन महिने धूळ खात असलेल्या गाड्या रस्त्यावर आणण्यापूर्वी त्यांची योग्य ती सर्व्हिसिंग करूनच बाहेर काढा. सर्व्हिसिंग न करता गाडी सुरू केल्यास ती पेट घेऊ शकते. अपघात टाळण्यासाठी सर्व्हिसिंग आवश्यक आहे, असे आवाहन मुंबई अग्निशमन दलाने मुंबईकरांना केले आहे. 'लॉकडाऊन' आता काही प्रमाणात शिथील करण्यात आले आहे. त्यामुळे रस्त्यावर मुंबईकरांसह वाहनेही मोठ्या प्रमाणात आली आहेत. मात्र, अनेक दिवस बंद असलेली वाहने धोकादायक ठरून अपघाताला कारणीभूत ठरू शकतात, असे आढळले आहे. त्यामुळे सर्व्हिसिंग करून ती रस्त्यावर आणणे वाहनचालकांच्या हिताचे ठरेल, असा मोलाचा सल्ला अग्निशमन दलाकडून देण्यात आला आहे.

### 'उषाकिरण'मध्ये गाडी पेटली

काही दिवसांपूर्वी नाना चौक परिसरातील उषाकिरण इमारतीत गाडी पेटल्याची घटना घडली होती. गाडीचा मालक गाडी घेऊन बाहेर गेला होता. परत आल्यानंतर तो गाडी पार्क करत असतानाच तिच्या इंजिनातून धूर येऊ लागला. त्याने इंजिन बंद केले. मात्र, इंजिनसह गाडी क्षणार्धात पेटली. अग्निशमन दलाच्या जवानांनी ती आग विझवली. आगीच्या कारणांचा शोध घेतल्यावर ही गाडी तीन महिने बंद होती. त्यामुळे या गाडीच्या इंजिनमधील इलेक्ट्रिक सर्किट खराब झाले होते. गाडी सुरू झाल्यानंतर सर्किटचा स्पार्क झाला आणि गाडी पेटली. गाडी सॅनिटाईज करण्यात आली नव्हती आणि या गाडीत सॅनिटायझरही आढळले नाही, असे अग्निशमन दलाने स्पष्ट केले आहे.

**METROPOLITAN STOCK EXCHANGE OF INDIA LTD.**
4th Floor, Vibgyor Towers, Plot No.C - 62, Opp. Trident Hotel, Bandra Kurla Complex, Bandra East, Mumbai – 400098. CIN - U65999MH2008PLC185856

**PUBLIC NOTICE**

Notice is hereby given that M/s. LKP Securities Ltd. the member of Metropolitan Stock Exchange of India Ltd. ("Exchange") having registered office at 203, Embassy Centre, Nariman Point, Mumbai – 400021 Maharashtra and SEBI Registration No. INZ000216033 have applied for surrender of their Trading Membership in Currency Derivatives, Equity Cash and Equity Derivatives Segments.

Any client/ constituent/member/investor having any claim / dispute /grievance with/against M/s. LKP Securities Ltd, arising out of trades executed in Currency Derivatives, Equity Cash and Equity Derivatives Segments of the Exchange are advised to furnish details of his/their claim in writing to the Arbitration & Investor Grievance Department of the Exchange at the Registered Office address indicated above, within 60 days from the date of this notification; enclosing therewith all supporting documents. No such claims / dispute / grievances filed beyond the said period will be entertained by the Exchange. The complaints filed against the above trading member will be dealt with in accordance with the Rules, Bye-laws and Regulations of the Exchange/Metropolitan Clearing Corporation of India Ltd.

The complaint form can be downloaded from www.msei.in>Investors> ComplaintFormat or maybe obtained from the Exchange office at Mumbai and also at the Regional Offices.

**For Metropolitan Stock Exchange of India Ltd.**
(formerly known as MCX Stock Exchange Ltd.)
*Sd/-*
Authorised Signatory

Place: Mumbai, Date: 30/06/2020